

// श्री //　　　　　　　　　　　　　　स्थापना १९६२

"ग्रामपंचायत हा लोकशाहीचा पाया आहे."

# ग्रामपंचायत कार्यालय, सारोळा आडवाई

ता. पारनेर, जि. अहमदनगर

श्री. परसराम गणपत फंड　　　　　　　　सौ.कोमल दत्तात्रय महांडूळे
सरपंच　　　　　　　　　　　　　　　　उपसरपंच

जा.क्र.:　　　　　　　　　　　　　　　दिनांक: २५ /0१/२०२२

प्रति,
मा. श्री.निलेशजी लंके साहेब,
आमदार, तालुका पारनेर,
विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य,

**विषय:- रस्ते मजबुतीकरण व डांबरीकरण होणेबाबत.**

माननीय महोदय,

वरील विषयानुसार आपणास सविनय सादर येते की, मौजे सारोळा अडवाई तालुका पारनेर हे गाव कवडेश्वर डोंगराचा पायथ्यापाशी वसलेले साधारण १५०० लोकसंख्या असलेले खेडेगाव आहे. या गावांमध्ये इयत्ता पहिली ते चौथी पर्यंत शाळा आहे. पुढील शिक्षण घेण्यासाठी मुलांना जामगाव ,पारनेर,भाळवणी,अहमदनगर या ठिकाणी जावे लागते, तसेच शेतकऱ्यांना आपला शेतीमाल पारनेर व अहमदनगर या मोठ्या बाजारपेठेत घेऊन जावा लागतो, वरील सर्व गोष्टींचा विचार केल्यास सारोळा अडवाई गावात कोणतेही दळणवळणाच्या सोयी उपलब्ध नाही, त्यामुळे माझ्या गावच्या लोकांचा विकास हा झालेला नाही, त्यांची आर्थिक शैक्षणिक बाजू बळकट करण्यासाठी दळणवळणाच्या सोयी या चांगले असणे गरजेचे आहे, त्यामुळे माझ्या गावातील खालील रस्त्यांचा विनासंकोच विचार व्हावा ही माझी नम्र विनंती,

१). जामगाव सारोळा अडवाई भोयरे पठार हद्द(ग्रामीण मार्ग ७३) कि.मी. ३/०० ते ७/००.

२).सारोळा अडवाई-महांडुळे वस्ती (फंड वस्ती)( ग्रामीण मार्ग २८४) कडे की.मी.०/०० ते २/००.

3).सारोळा अडवाई ते इजीमा १०४ जोड रस्ता(चिंचेचा मळा) योजना बाह्य रस्ता कि.मि. ०/०० ते २/५००

वरील रस्त्यांचीही आपल्या स्तरावरून अंमलबजावणी होऊन सदर रस्त्याचा प्रश्न मार्गी लावावा जेणेकरून सारोळा अडवाई समस्त ग्रामस्थांचा शेतीमालाचा व मुलांच्या शिक्षणाचा समस्त ग्रामस्थांचा शेतीमालाचा व मुलांचे शिक्षणाचा प्रश्न मार्गी लागेल प्रश्न मार्गी लागेल तरी सदर रस्त्याची आपल्या स्तरावरून लवकरात लवकर कार्यवाही व्हावी ही नम्र विनंती,

मे.जा व्हावे,

आपला विश्वासू,
श्री.परसराम गणपत फंड(सरपंच)
सरपंच
सारोळा अडवाई तालुका पारनेर
ग्रामपंचायत सारोळा अडवाई
ता. पारनेर, जि. अहमदनगर

// श्री //　　　स्थापना १९६२

"ग्रामपंचायत हा लोकशाहीचा पाया आहे."

# ग्रामपंचायत कार्यालय, सारोळा आडवाई

ता. पारनेर, जि. अहमदनगर

| श्री. परसराम गणपत फंड | सौ.कोमल दत्तात्रय महांडूळे |
|---|---|
| सरपंच | उपसरपंच |

जा.क्र.:　　　　　　　　　　　　　　　　दिनांक :२५/०१/२०२२

ग्रामपंचायत कार्यालय, सारोळा अडवाई, ता. पारनेर जि. अहमदनगर

## मासिक ठराव सभा नक्कल

ग्रामपंचायत मासिक सभा सरपंच यांचे अध्यक्षेतेखाली दि-२५/०१/२०२२ रोजी सकाळी १०.०० वा. घेनेत आली होती त्यामध्ये खालील विषयावर चर्चा करण्यात आली,

विषय क्र. ६ /　:-आमदार निधी योजने अंतर्गत निधीची मागणी करणे बाबत.

ठराव क्र. ६ /　:- सदर सभेत सदर विषयावर चर्चा होऊन असे ठरले कि,आपल्या सारोळा अडवाई गावच्या विकास कामासाठी आमदार निधी योजने अंतर्गत निधीची मागणी करणे बाबत.

**१). जामगाव सारोळा अडवाई भोयरे पठार हद्द(ग्रामीण मार्ग ७३) कि.मी. 3/०० ते ७/००.**

**२).सारोळा अडवाई-महांडुळे वस्ती (फंड वस्ती)( ग्रामीण मार्ग २८४) कडे की.मी.०/०० ते २/००.**

**3).सारोळा अडवाई ते इजीमा १०४ जोड रस्ता(चिंचेचा मळा) योजना बाहय रस्ता किमि. ०/०० ते २/५००**

वरील प्रकारची विकास कामे आमदार निधी योजने च्या निधीतून मागणी करण्यात यावी,

तसेच वरील कामे पूर्ण झाल्यानंतर सदर कामाची देखभाल दुरुस्तीग्रामपंचायत मार्फत करणे बाबत सर्वानुमते ठरले.

सूचक : - कुंदा गणेश आबुज

अनुमोदक :- संगीता उत्तम फंड

ठराव बहुमताने मंजूर असे

ग्रामसेवक
ग्रामपंचायत सारोळा अडवाई
ता. पारनेर जि. अहमदनगर
ग्रामविकास अधिकारी

सरपंच
ग्रामपंचायत सारोळा अडवाई
ता. पारनेर, जि. अहमदनगर